रेल्वेच्या पैसेंजर सर्विसेस कमिटीचे सदस्य जय नागवानी 21 जुनला करणार बाबुपेठ उड़ाण पुल व बल्लारपुर रेल्वे स्टेशनचा पाहणी दौरा

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्यासह होणार दौरा आणि बैठक

भारत सरकारच्या रेल्वे विभागा अंतर्गत येणाऱ्या पैसेंजर सर्विसेस कमिटीचे सदस्य श्री जय  नागवानी दि. 21 जून रोजी चंद्रपुरातील बाबुपेठ येथील रेल्वे उड़ाण पुलाशी संबंधित समस्यांची पाहणी करण्यासाठी तसेच बल्लारपुर रेल्वे स्टेशनची पाहणी करण्यासाठी चंद्रपुर दौऱ्यावर येत आहेत. माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांना पाहणी दौऱ्यासाठी आमंत्रित केले आहे.

दि 21 जून रोजी सायं 5 वाजता श्री जय नागवानी चंद्रपुर व बल्लारपुर येथील पाहणी केल्यानंतर आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याशी बैठक करतील. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नुकतीच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांसह बैठक घेतली होती. त्यावेळी रेल्वे बोर्डाच्या सदस्याना पाहणी साठी आमंत्रित करण्यात येईल असे त्यांनी जाहिर केले होते . त्यानुसार पैसेंजर सर्विसेस कमिटीचे सदस्य श्री जय नागवानी पाहणी दौऱ्यावर येत आहेत.